## माहिती अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत गठीत करण्यात आलेल्या प्रथम अपीलीय अधिकारी यांच्यासमोर

### अपिल क्रमांक ६/२०१५

**श्री.पराग विठ्ठल चव्हाण,** ... अपिलकर्ता
२/८२, इंडिया युनायटेड मिल्स चाळ,
डॉ.बाबासाहेब आंबेडकर रोड,
परळ, मुंबई-४०० ०१२.

विरुध्द

जन माहिती अधिकारी
महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ,
मुंबई ... प्रतिवादी

## <u>आदेश</u>

अर्जदार (अपिल करणार) यांनी मूळ अर्ज दिनांक १७.०९.२०१४ रोजीचा माहिती अधिकारी (प्रतिवादी) यांच्याकडे सादर केलेला होता. त्यामध्ये असे स्पष्ट करण्यात आले आहे की, अर्जात मागितलेली माहिती अर्धवट दिलेली असून त्यामुळे माहिती अधिकारी अधिनियम, २००५ च्या तरतुदींचे उल्लंघन झालेले आहे तसेच असेही स्पष्ट करण्यात आलेले आहे की, सदरहु माहिती व्यक्तिगत स्वरुपातील नूसन सेवा अभिलेखामध्ये नोंद केलेली माहिती आहे. त्यामुळे माहिती देण्याचे नाकारल्यामुळे दिलेल्या उत्तराने समाधान झालेले नाही. त्यामध्ये मागविण्यात आलेल्या माहितीबाबत (मुद्यांबाबत) चर्चा होऊन खालीलप्रमाणे निर्णय घेण्यात आलेला आहे.

१) लेखा अधिकारी (आस्थापना) यांनी असे स्पष्ट केले की, त्यांच्याकडे उपलब्ध असणारी माहिती त्यांनी दिनांक १९.११.२०१४ रोजी माहिती अधिकारी (आस्थापना) यांना प्राप्त करुन दिली. माहिती अधिकारी आस्थापना यांनी सदरहु माहिती दिनांक २०.११.२०१४ रोजी म्हणजेच विहीत कालावधीमध्ये उपलब्ध करुन दिलेली आहे, त्याबाबत अर्जदाराची तक्रार नाही.

२) आस्थापना शाखेतर्फे अशी विचारणा करण्यात आली की, अपिलकर्त्यास कोणती माहिती उपलब्ध झालेली नाही आणि कोणत्या अपूऱ्या माहितीबाबत त्यांचे समाधान झालेले नाही. त्याबाबत असेही स्पष्ट करण्यात आले की, एकूण ३६९ पाने त्यांना छायांकित व साक्षांकित करुन दिलेले आहेत.

त्याबाबत अपिलकर्ता यांनी असे स्पष्ट केले की, मिळालेल्या माहितीपैकी ३ ते ४ छायांकित प्रतीवरील अभिप्राय/माहिती अस्पष्ट असल्यामुळे त्यांचे त्याबाबत समाधान झालेले नाही. त्याबाबत असे ठरले की, माहिती अधिकारी यांनी मूळ नस्ती दाखवून, ज्या छायांकित प्रतींवरील माहिती अस्पष्ट आहे किंवा ज्यामुळे त्यांचे समाधान झालेले नाही, ती माहिती त्यांना त्वरीत दाखवून, छायांकित प्रती नव्याने उपलब्ध करुन दाव्यात.

त्याप्रमाणे आस्थापना शाखेने श्री.कवरे यांची धारीका उपलब्ध करुन दिली व त्यामध्ये कोणतीही अस्पष्ट माहिती आढळली नाही.

३) अपिलकर्ता यांनी असे स्पष्ट केले की, त्यांनी मागितलेल्या माहितीपैकी मुद्या क्र. ३१ ते ३४ (नियुक्तीच्या वेळी श्री.संजय कवरे यांच्या किंवा कुटुंबियांच्या अथवा अन्य कोणत्याही व्यक्तीच्या नावे धारण केलेली स्थावर मालकत्ता, जंगम मालमत्ता आणि स्थावर मालमत्तेच्या व जंगम मालमत्तेच्या विवरणपत्राची माहिती) त्यांना प्राप्त करुन देण्यात आलेली नाही.

त्याबाबत आस्थापना शाखेतर्फे असे स्पष्ट करण्यात आले की, श्री.संजय कावरे यांच्या मालमत्तेबाबत माहिती मागितलेली असल्यामुळे, त्यांची सहमती त्याबाबत विचारली असता, त्यांनी अशी वैयक्तिक माहिती देण्यास सक्त विरोध दर्शविला होता. तसेच असेही स्पष्ट केले होते की, माझी वैयक्तिक माहिती असल्याने, त्या माहितीचा भविष्यात दुरुपयोग होऊ शकतो त्याबाबत त्यांच्यावर किंवा कुटुंबियांवर विपरीत परिणाम झाल्यास, त्यास म.प्र.नि.मंडळ जबाबदार असेल आणि सदर माहितीचा गैरवापर झाल्यास मला न्यायालयात यासंदर्भात दाद मागावी लागेल.

दरम्यानच्या काळात आस्थापना शाखेस सामान्य प्रशासन विभाग, महाराष्ट्र शासन परिपत्र क्र.संकीर्ण २०१२/९८९/प्र.क्र.४७९/सहा, दिनांक १७.१०.२०१४ चे परिपत्रक प्राप्त झाले, त्यामध्ये श्री.एच.ई.राजसरकरप्पा विरुध्द राज्य जन माहिती अधिकारी (याचिका क्र.१०६६३/२००६) उच्च न्यायालय, कर्नाटक यांच्या निर्णयाच्या आधारे विधी व न्याय विभागाने संदर्भ देवून असे सूचित केलेले आहे की, माहिती अधिकारी अधिनियम, २००५ च्या कलम ८ पोटकलम(त्र) मधील तरतुदीनुसार माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी यांना माहिती देण्याचे बंधन नाही अशी आणि लोकहिताच्या दृष्टीने व्यापक जनहित साध्य न करणारी किंवा विशेषत: जी त्रयस्थ पक्षाबरोबर उद्भवलेल्या वादांच्या अनुषंगाने मागविलेली माहिती, माहिती अधिकारात अर्जदारास देण्यात येवू नये.

श्री.कवरे यांनी घेतलेल्या हरकतीमुळे असे स्पष्ट जाणवते की, त्यांना त्यांची वैयक्तिक माहिती अपिल करणाऱ्यास देवू नये असे स्पष्ट त्यांनी कळविलेले आहे.

तसेच सदरहु परिपत्रकाच्या सुरुवातीसच असे स्पष्ट करण्यात आलेले आहे की, शासकीय कर्मचारी / अधिकारी यांच्या सेवा कालावधीत मिळालेली ज्ञापने, कारणे दाखवा नोटीस, शिक्षादेश, त्यांच्या सेवानियमांतर्गत

कामगिरीबाबतचा अहवाल, त्यांच्या चल/अचल संपत्तीबाबतची माहिती, त्यांनी केलेली आर्थिक गुंतवणूक वा बँक किंवा अन्य वित्तीय संस्थांकडून घेतलेली कर्जे, त्यांच्या मुलांच्या विवाहात मिळालेल्या भेटी, आयकर विवरणपत्र यासारखी वैयक्तिक तपशीलासंबंधातील माहिती देण्याचे बंधन माहिती अधिकाऱ्यांवर नसल्याचा स्पष्ट निर्णय स्पेशल लिव्ह पिटीशन न.२७७३४/२०१२ (गिरीष रामचंद्र देशपांडे विरुध्द केंद्रीय माहिती आयोग) या प्रकरणात दिनांक ०३.१०.२०१२ रोजी मा.सवोच्च न्यायालयाने दिलेला आहे, असे स्पष्ट केलेले आहे सोबत सदरहु परिपत्रकाची प्रत अपिल करणार यांच्या माहितीसाठी जोडण्यात येत आहे.

येणेप्रमाणे वरील परिपत्रकाद्वारे, श्री.कवरे यांनी घेतलेल्या हरकतीमुळे अपील करणार यांना सदरहु माहिती देता येत नाही आणि सदरहु अपील निकाली काढण्यात येत आहे.

दिनांक ८/१/२०१५ रोजी मुंबई येथून,

देवळे ८।१।१५

( द. त्रि. देवळे )

प्रथम अपिलीय अधिकारी(आस्थापना)